# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 15/09/2023 (शुक्रवार) सकाळ

---

### मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण यांची तान्हा पोळा या सण उत्सवानिमीत्त पोस्टे कन्हान येथे बंदोबस्ताचे ठिकाणी भेट तसेच पोलीस स्टेशन कन्हान येथील नुतन इमारतीच्या बांधकामाचा आढावा

दिनांक १५/०९/२०२३ रोजी पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भा. पो. से.) यांनी पोस्टे कन्हान अंतर्गत येणाऱ्या अशोक नगर आंबेडकर चौक येथे तान्हा पोळा या सण उत्सवानिमीत्त बंदोबस्त असलेल्या ठिकाणी भेट देवून बंदोबस्ताची पाहणी केली. त्या ठिकाणी बंदोबस्तासाठी हजर असलेले पोलीस स्टेशन कन्हान येथील पोलीस अधिकारी व अंमलदार यांना बंदोबस्ता दरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडुन वाद निर्माण होणार नाही याची दक्षता घेण्याचे आदेश दिले. तसेच त्या ठिकाणी हजर असलेल्या नागरीकांना पोळा सणाच्या शुभेच्छा दिल्या.

पोलीस स्टेशन कन्हान येथील नविन इमारतीच्या बांधकामाचा आढावा घेण्यात आला. पोलीस स्टेशन कन्हान येथील जुनी इमारत ही अत्यंत जर्जर झाल्याचे निदर्शनास आल्याने पोलीस स्टेशनचे नविन इमारतीचे बांधकाम सुरू असलेल्या ठिकाणी मा. पोलीस अधीक्षक यांनी भेट देवुन बांधकामाचे निरीक्षण केले व कॉंट्रेक्टर यांना सदर इमारतीचे बांधकाम लवकरात लवकर पूर्ण करून इमारत पोलीस स्टेशन कन्हान यांना हस्तांतर करण्याचे कळविले आहे.





पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर